**सं.फौ.ख. क्र. ५००/२०२५**
**स्टेट वि. भिमराव.**
**नि.क्र.०७ खाली.**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ यांची जबानी.</u>**

मी ईश्वराला स्मरून शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि खऱ्याशिवाय काहीही सांगणार नाही –

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | : | रविंद्र सुर्यभानजी आंबुडारे, |
| वय सुमारे | : | ४३ वर्ष, व्यवसाय– पोलीस हवालदार ब.नं.१५७१, |
| निवासस्थान | : | पोलीस ठाणे, अड्याळ. |
| तालुका | : | पवनी, जिल्हा: भंडारा. |

**<u>सरतपास</u> – <u>सहा</u>. <u>सरकारी वकील पी.आर.लिंगायत मॅडम यांच्यामार्फत</u>–**

**१.** घटना दिनांक २४.०५.२०२५ रोजी घडली होती. त्यावेळी मी पोलीस ठाणे,अड्याळ येथे पोलीस हवालदार या पदावर कार्यरत होतो. त्या दिवशी पोलीस हवालदार मंगेश बाबरे यांच्या सोबत पेट्रोलींग कामे माझी ड्युटी लागली होती. आम्हाला गुप्त माहीतीद्वाराद्वारे माहीती मिळाली की, आरोपी भिमराव उके हा बोरगाव येथे त्याच्या राहत्या घरी अवैधरित्या दारू विक्री करीत आहे. त्यानंतर आम्ही आरोपीच्या घरी गेलो. आमच्या सोबत दोन पंच देखील होते. पंचांना सुचनापत्र मी दिले होते. आता मला ते सुचनापत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी व पंचांची सही असून त्यातील मजकूर बरोबर व खरा आहे. त्यास **नि.क्र.** ८ देण्यात येतो. त्यानंतर आम्ही त्याला आमची आणि पंचांची ओळख सांगीतली. तसेच येण्याचे कारण सांगुण त्याला आमची अंगझळती घेण्यास सांगीतले. त्याने अंगझळती घेण्यास नकार दिला. त्यानंतर आम्ही पंचांसमक्ष आरोपीच्या घराची झडती घेतला असता घरातून एक पांढऱ्या रंगाची बीना झाकणाची डबकी मिळाली. त्या डबकीत चार लिटर हात भट्टी दारू होती. त्याचा वास आम्ही पंचांना दिला. डबकीतील काही दारू एका १८० मी.ली. क्षमतेच्या काचेच्या बाटलीत वेगळी काढण्यात आली. उर्वरीत दारू नाश करण्यात आली. घटनास्थळ आणि जप्ती पंचनामा मी तयार केले होते. आता मला ते दाखविण्यात आले. ते तेच आहेत. त्यावर माझ्या आणि पंचांच्या सह्या आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यांना अनुक्रमे **नि.क्र.०९** आणि **१०** देण्यात येतो. त्यानंतर पोलीस ठाण्यात येवून मी तक्रार दिली. आता मला माझी तक्रार दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्रं.११** देण्यात येते. आता मला माझा छापील प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्रं.१२** देण्यात येते. आरोपीला मी ओळखतो. तो आज रोजी न्यायालयात हजर

आहे.

**सरतपास संपला.**

**<u>उलटतपास – आरोपीतर्फे वकील श्री. व्ही. आर.मेश्राम साहेब यांच्यामार्फत सुरू.</u>**

**०२.** मे २०२५ मध्ये आमच्या पोलीस ठाण्यात दारूच्या कीती केसेस दाखल झाल्या हे मला माहीत नाही. आरोपीच्या घराचे कागदपत्रे मी जप्त केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, पंचांच्या सह्या रस्त्यावर घेण्यात आल्या. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामे पंचांना वाचून दाखविण्यात आले नाही. दारू नाशवंत नाही. दारू नाश केल्याचा पंचनामा मी केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीकडून दारू जप्त करण्यात आली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीविरूध्द मी खोटी तक्रार देवून आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

समक्ष

स्वा/–
**(व्ही. आर. फरकुंडे)**
न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे. (न्या.क्र.२),
पवनी.
०५/०३/२०२६

श्रवणोत्तर स्विकृत

स्वा/–
**(व्ही. आर. फरकुंडे)**
न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे., (न्या.क्र.२)
पवनी.
०५/०३/२०२६